स्पेनची इटलीवर सरशी

अंतिम फेरीत प्रवेश; जोसेलूचा निर्णायक गोल

एपी, एन्शेडे (नेदरलँड्स)

अखेरची काही मिनिटे शिल्लक असताना आघाडीपटू जोसेलूने केलेल्या निर्णायक गोलच्या बळावर स्पेनने इटलीवर २-१ अशी सरशी साधत नेशन्स लीग फुटबॉलची अंतिम फेरी गाठली.

नेशन्स लीग फुटबॉल

नेदरलँड्स येथे झालेल्या उपांत्य फेरीच्या लढतीत स्पेनने बराच वेळ चेंडू आपल्याकडे राखला, तर इटलीने भक्कम बचाव करताना प्रतिहल्ला करण्यावर भर दिला. या सामन्याची सुरुवातच रंगतदार झाली. तिसऱ्या मिनिटाला येरेमी पिनोने गोल झळकावत स्पेनला आघाडी मिळवून दिली. मात्र, ही आघाडी केवळ आठ मिनिटेच टिकू शकली. ११व्या मिनिटाला इटलीला पेनल्टी मिळाली. यावर चिरो इमोबिलेने गोल करत इटलीला १-१ अशी बरोबरी करून दिली.

यानंतर मात्र दोन्ही संघांना गोलच्या फारशा संधी निर्माण करता आल्या नाहीत. त्यामुळे उत्तरार्धात टप्प्याटप्प्याने दोन्ही संघांनी प्रत्येकी पाच बदली खेळाडू मैदानावर आणले. यापैकीच एक जोसेलूने निर्णायक कामगिरी केली. ८८व्या मिनिटाला मध्यरक्षक रॉड्रीने मारलेला फटका इटलीच्या बचावपटूंना लागून गोलसमोर उभ्या जोसेलूकडे गेला आणि जोसेलूने चेंडूला गोलजाळ्याची दिशा देत स्पेनला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. यानंतर स्पेनने चेंडूवर ताबा राखताना विजय साकारला.

आता रविवारी होणाऱ्या नेशन्स लीगच्या अंतिम सामन्यात स्पेनसमोर क्रोएशियाचे आव्हान असेल. क्रोएशियाने उपांत्य फेरीच्या सामन्यात यजमान नेदरलँड्सला ४-२ अशा फरकाने नमवले होते.

२ स्पेनने दुसऱ्यांदा नेशन्स लीगची अंतिम फेरी गाठली आहे. २०२१मध्ये स्पेनने इटलीलाच नमवत अंतिम फेरीत प्रवेश मिळवला होता, पण त्यांना फ्रान्सकडून पराभव पत्करावा लागला होता.

मंजू राणी आशियाई पात्रतेपासून दूरच

भुवनेश्वर : राष्ट्रीय विक्रमाची मानकरी पंजाबच्या मंजू राणीने राष्ट्रीय आंतरराज्य ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत शुक्रवारी महिलांच्या ३५ किलोमीटर चालण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. मात्र, आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी तिला पात्रता मिळवता आली नाही.

राष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धा

२४ वर्षीय मंजूने ३ तास २१ मिनिटे व ३१ सेकंदांमध्ये शर्यत पूर्ण केली. आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी पात्रता वेळ २ तास ५८.३० सेकंद अशी वेळ निश्चित करण्यात आली आहे. मंजूने फेब्रुवारीमध्ये रांची येथे झालेल्या चालण्याच्या शर्यतीत २ तास ५७.५४ सेकंद अशी विक्रमी वेळ नोंदवली होती.

रीकर्व्हमध्ये भारताला कांस्यपदक

पीटीआय, मेडेलिन (कोलंबिया)

भारताच्या पुरुष रीकर्व्ह तिरंदाजी संघाने चीनला नमवत विश्वचषक स्पर्धेच्या तिसऱ्या टप्प्यात कांस्यपदकाची कमाई केली. चौथ्या मानांकित तुषार शेळके, मृणाल चौहान आणि धीरज बोम्मादेवारा या भारतीय त्रिकुटाने चीनच्या यांग केयांग, लि मेंगाक्यू आणि वँग यान यांना ५-३ अशा फरकाने पराभूत करत पुरुषांच्या रीकर्व्ह सांघिक गटात कांस्यकमाई केली.

विश्वचषक तिरंदाजी स्पर्धा

भजन कौर, संगीता आणि तनिषा यांचा समावेश असलेल्या भारताच्या महिला रीकर्व्ह संघाला फ्रान्सकडून ३-५ अशा फरकाने पराभूत व्हावे लागले. या संघाचे आव्हान दुसऱ्याच फेरीत संपुष्टात आले.

भारताने पुरुष व महिला सांघिक कंपाऊंड प्रकारात कांस्यपदकाने सुरुवात केली होती. त्यापूर्वी, युवा तिरंदाजीपटू भजनने महिलांच्या रीकर्व्ह पात्रता फेरीत अव्वल दहा जणांमध्ये स्थान मिळवले.

कोरियाच्या तिरंदाजांच्या वर्चस्वपूर्ण कामगिरीनंतरही भजनने ६६८ गुणांसह नववे स्थान पटकावले. पुरुषांच्या रीकर्व्ह पात्रता फेरीत शेळकेने चांगली कामगिरी केली. ६७१ गुणांसह तो १६व्या स्थानी राहिला. भारताच्या पुरुष रीकर्व्ह संघाला चौथे मानांकन मिळाल्याने उपांत्य फेरीत त्यांचा कोरियाशी सामना होण्याची शक्यता आहे.

अ र्थ स त्ता

सेन्सेक्स, निफ्टीचा ऐतिहासिक उच्चांक

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : जागतिक बाजारातील सकारात्मक कल आणि बँकिंग, वित्त आणि भांडवली वस्तू क्षेत्रातील कंपन्यांचे समभाग वधारल्याने शुक्रवारच्या सत्रात भांडवली बाजारातील प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टी उच्चांकी पातळीवर विसावले. डॉलरच्या तुलनेत वधारलेला रुपया आणि परदेशी गुंतवणूकदारांकडून होत असलेल्या समभाग खरेदीमुळे निर्देशांकांना अधिक बळ मिळाले.

दिवसअखेर सेन्सेक्स ४६६.९५ अंशांनी वधारून ६३,३८४.५८ या ऐतिहासिक विक्रमी उच्चांकावर स्थिरावला. दिवसभरात त्याने ६०२.७३ कमाई करत ६३,५२०.३६ अंशांची उच्चांकी पातळी गाठली. गेल्या वर्षी १ डिसेंबर रोजी निर्देशांकाने ६३,२८४.१९ अंशांचा उच्चांक गाठला होता. तर निफ्टीने १३७.९० अंशांची भर घातली आणि तो १८,८२६ अंशांच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचला. याआधी त्याने १८,८१२.५० अंशांची विक्रमी पातळी गाठली होती.

साप्ताहिक आधारावर, सेन्सेक्सने ७५८.९५ अंशांची कमाई केली. म्हणजेच आठवडाभरात तो १.२१ टक्क्यांनी झेपावला आणि तर निफ्टीमध्ये २६२.६ अंशांची (१.४१ टक्के) वाढ झाली.

जागतिक बाजारातील सकारात्मक संकेतांसह बँकिंग, औषधी निर्माण आणि ग्राहकपयोगी वस्तू क्षेत्रातील समभागांमध्ये जोरदार खरेदीमुळे तेजीवाल्यांनी पुन्हा एकदा भांडवली बाजाराचा ताबा घेतला आहे. अर्थव्यवस्था सुस्थितीत असल्याचे दर्शविणाऱ्या अमेरिकेतील किरकोळ विक्रीच्या आकडेवारीने अमेरिकी बाजाराचा आशावाद वाढला आहे. आयात कमी झाल्याने फेडकडून व्याजदर वाढीला दीर्घकालीन विराम मिळण्याची आशा निर्माण झाली आहे, असे निरीक्षण जिओजित फायनान्शियल सर्व्हिसेसचे संशोधन प्रमुख विनोद नायर यांनी नोंदवले.

रुपयाला सबळता; महिन्यातील सर्वोत्तम झेप

भांडवली बाजारातील तेजीवाल्यांच्या सरशीचे अनुकरण करीत शुक्रवारी रुपया ३४ पैशांनी वाढून अमेरिकी डॉलरच्या तुलनेत एक महिन्यांच्या उच्चांकावर बंद झाला. बाजारात परदेशी गुंतवणुकीचा ओघ वाढत असल्याचे हे द्योतक असल्याचे चलन बाजारातील व्यापाऱ्यांनी सांगितले. सकाळच्या सत्रात रुपयाने ८१.९७ या मजबुतीसह व्यवहाराला सुरुवात केली. सत्रात ८१.८६ चा उच्चांक गाठल्यानंतर दिवसअखेर ३४ पैशांची वाढ नोंदवून रुपया ८१.९४ वर स्थिरावला.

करोनाकाळातील बुडीत-पुनर्गठित कर्जेही धोक्यात!

कर्जांचे निर्लेखन मात्र खासगी बँकांमध्ये दुपटीने अधिक

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: करोनासारख्या संकटकाळात थकीत झालेली कर्ज खाती, नव्या अटी-शर्तींसह पुनर्गठित केली गेली आणि ती पुन्हा थकल्याने अखेर त्यांचे बँकेच्या नोंदीतून निर्लेखन (राइट-ऑफ) करण्याची पद्धत बहुतेक सर्वच बँकांनी अनुसरली असली तरी हे प्रमाण खासगी बँकांमध्ये सरकारी बँकांच्या तुलनेत दुपटीने जास्त असल्याचे शुक्रवारी प्रसिद्ध झालेल्या अहवालाने प्रकाशात आणले आहे. मागील दोन तिमाहींमध्ये सर्वच बँकांच्या अनुत्पादित कर्जाचे प्रमाण लक्षणीयरीत्या घसरून, त्यांनी दमदार नफा कमावल्याचे जे गुलाबी चित्र दिसून येते तो केवळ वरवरचा मुलामा असल्याचेही या अहवालाने अधोरेखित केले आहे.

करोना साथीच्या आजारानंतर, अनुत्पादित मालमत्तांच्या प्रमाणात नव्याने भर (स्लिपेजेस) आणि त्याचे पर्यवसान अखेर कर्ज निर्लेखनांत (राइट-ऑफ) झाल्याचे प्रमाण हे खासगी क्षेत्रातील बँकांमध्ये ४४ टक्के आहे, तर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या बाबतीत हे प्रमाण २३ टक्के आहे, असे इंडिया रेटिंग्स अँड रिसर्चच्या ताज्या अहवालाने नमूद केले आहे. बहुतेक सर्वच बँकांनी ही ताळेबंद स्वच्छ करण्याची 'आश्चर्यजनक' प्रवृत्ती अनुसरल्याचे दिसून आले आहे, अशी अहवालाची टिप्पणी आहे.

सरलेले आर्थिक वर्ष २०२२-२३ सालाच्या बँकांच्या वार्षिक निकालांचे विश्लेषण इंडिया रेटिंग्जने केले आहे. त्यात असे आढळून आले की, सप्टेंबर २०२२ अखेर तिमाहीमध्ये बँकांच्या ताळेबंदामध्ये पुनर्गठित कर्ज मालमत्तांचे प्रमाण शिखर गाठणारे होते. तेव्हा पुनर्गठित कर्जाचे एकूण प्रमाण २.२ लाख कोटी रुपयांवर पोहोचले होते.

करोना साथीच्या उद्रेकानंतर, घाईघाईने देशव्यापी टाळेबंदी लागू केली गेली ज्यामुळे अर्थचक्र ठप्प झाल्याने अनेक व्यवसायांपुढे अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. रिझर्व्ह बँकेने अशा उद्योग-व्यवसायांना दिलासा म्हणून कर्ज पुनर्गठन योजना जाहीर केली आणि त्यानंतर केंद्राकडूनही आणखी एक विस्तारित योजना जाहीर केली गेली.

करोनाकाळात पुनर्गठित केलेल्या थकीत कर्ज खात्यांचा अनुभव हा भूतकाळात या धर्तीच्या योजनांबाबत आलेल्या अप्रिय अनुभवाच्या तुलनेत सौम्य आहे, असे इंडिया रेटिंग्जने म्हटले आहे. चिंताजनक बाब ही की, पत गुणवत्तेच्या आघाडीवर, बँकांनी 'पाटी स्वच्छ कोरी' करण्याची प्रवृत्ती अनुसरली आणि आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये म्हणजे मार्च २०२३ अखेर बँकांच्या बुडीत कर्जाच्या स्थितीत सुधारणा नोंदवली गेली, यावर अहवालाने बोट ठेवले आहे.

बँका गत दशकभरातील सर्वोत्तम पत गुणवत्तेची कामगिरी दर्शवत आहेत. भारताच्या संपूर्ण बँकिंग व्यवस्थेसासाठी सकल अनुत्पादित मालमत्तेचे (ग्रॉस एनपीए) प्रमाण २०२२-२३ अखेरीस वार्षिक तुलनेत तब्बल ४ टक्क्यांपर्यंत सुधारले आहे, याची दखल घेताना अहवालाने ही टिप्पणी केली आहे.

SBFC एसबीएफसी फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : युनिट नं. १०३, पहिला मजला, सी अँण्ड बी स्क्वेअर, संगम कॉम्प्लेक्स, गाव चकाला, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०५९.

ताबा सूचना

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ च्या कलम ८(२) नुसार)

ज्याअर्थी एसबीएफसी फायनान्स लिमिटेड यांचे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी दी सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ नुसार आणि दी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ च्या नियम ८ सोबत वाचावयाच्या कलम १३(१२)अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करताना निम्नोल्लेखित कर्जदारांना/ सह-कर्जदारांना डिमांड नोटिसा जारी करून उक्त नोटीस मिळावयाच्या तारखेपासून ६० दिवसांत सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्यास फर्मावले. कर्जदाराने/ सह-कर्जदारांनी रकमेची परतफेड न केल्यामुळे कर्जदाराला/ सह-कर्जदारांना आणि सामान्यतः जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की उक्त नियमांच्या नियम ८ सोबत वाचावयाच्या उक्त अधिनियमाच्या कलम १३(४) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करून निम्नस्वाक्षरीकारांनी निम्नोल्लेखित तारखांना येथील निम्नवर्णित मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदाराला/ सह-कर्जदारांना आणि सामान्यतः जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की या मालमत्तेचा खरेदी-विक्री व्यवहार करू नये आणि या मालमत्तेचा कोणताही खरेदी-विक्री व्यवहार हा **एसबीएफसी फायनान्स लिमिटेड** यांच्या भारासापेक्ष राहील.

कर्जदाराचे नाव व पत्ता आणि डिमांड नोटिसची तारीख	मालमत्तेचे वर्णन आणि ताबा घेण्याची तारीख	ताबा सूचनेत मागणी केलेली रक्कम (रु.)
१. विरेंद्र शांतीलाल मुठा, २. नमिता विरेंद्र मुठा, ३. लौकिक के. बेडमुठा ए-३, पुष्पा व्हिला सोसायटी, दिंडोरी रोड, पंचवटी, नाशिक, महाराष्ट्र - ४२२००३. **डिमांड नोटिसची तारीख :** १४ जुलै २०२१ **कर्ज क्र.** ०१९००००८३३५डीएच(पीआर००६८०४९२)	नाशिक येथे स्थित सीटीएस नं. ६१३८ ए धारण करणाऱ्या भूमापन क्र. १०८/ए/५/४+१०८/ए/५/५ पैकी, भूखंड क्र. ८+९ वर बांधलेल्या, ''पुष्पा व्हिला को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड'' म्हणून ज्ञात इमारतीच्या १ल्या मजल्यावरील ५०.६३ चौ.मी. बिल्टअप क्षेत्रफळाच्या सदनिका क्र. ए-०४ आणि ५१.५६ चौ.मी. क्षेत्रफळाच्या सदनिका क्र. ए-०३ धारण करणाऱ्या मालमत्तेचे सर्व भाग व हिस्से. **ताबा घेण्याची तारीख :** १३ जून २०२३	**रु. २२६०८१६/-** (रुपये बावीस लाख साठ हजार आठशे सोळा फक्त) १४ फेब्रुवारी २०२३ रोजीनुसार
१. अनिलकुमार अंबालाल पटेल, २. बेला अनिलकुमार पटेल सदनिका क्र. ०५, वैभव अपार्टमेन्ट, पटेल फरसाणच्या मागे, त्रिमूर्ती नगर, हिरावाडी रोड, नाशिक, नाशिक, महाराष्ट्र- ४२२००३. **डिमांड नोटिसची तारीख :** २० ऑगस्ट २०२१ **कर्ज क्र.** ०१९००००९६४०डीएच (पीआर००६८०६४०)	गाव नाशिक येथे स्थित भूमापन क्र. १८९/३/१बी/१(पी) पैकी २९२ चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंड क्र. ०१ वर बांधलेल्या ''वैभव अपार्टमेंट'' म्हणून ज्ञात योजनेतील दुसऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. ०५ क्षेत्रफळ ५३.९८ चौ.मीटर म्हणजेच ५८१ चौ.फूट बिल्टअप + १०.४० चौ.मीटर म्हणजेच ११२ चौ.फूट क्षेत्रफळाची टेरेस धारण करणाऱ्या मालमत्तेचे सर्व भाग व हिस्से. सीमाबद्धता : पूर्वेला : साइड मार्जिनची जागा, पश्चिमेला : साइड मार्जिनची जागा, दक्षिणेला : साइड मार्जिनची जागा, उत्तरेला : सदनिका क्र. ०४ **ताबा घेण्याची तारीख :** १३ जून २०२३	**रु. १२९४९६२/-** (रुपये बारा लाख चौऱ्याण्णव हजार नऊशे बासष्ट फक्त) १४ फेब्रुवारी २०२३ रोजीनुसार
१. अनिकुमार अंबालाल पटेल, २. बेला अनिलकुमार पटेल सदनिका क्र. ०५, वैभव अपार्टमेंट, पटेल फरसाणच्या मागे, त्रिमूर्तीनगर, हिरावाडी रोड, नाशिक, नाशिक, महाराष्ट्र- ४२२००३. **डिमांड नोटिसची तारीख :** २० ऑगस्ट २०२१ **कर्ज क्र.** ०१९००००९६४१डीएच(पीआर००६८०६४१)	गाव नाशिक, ता. आणि जिल्हा नाशिक येथील क्षेत्रफळ १४१.३२ चौ.मीटरच्या सीटी सर्व्हे नं. ५७२०वर बांधलेल्या ''शंकरनाना हाइट्स अपार्टमेंट'' म्हणून ज्ञात योजनेतील तळ मजल्यावरील ६.८१ चौ.मीटर चटई क्षेत्रफळाच्या म्हणजेच १२.१६ चौ.मीटर बिल्टअप क्षेत्रफळाच्या शॉप नं. १ए धारण करणाऱ्या मालमत्तेचे सर्व भाग आणि हिस्से. सीमाबद्धता पुढीलप्रमाणे : पूर्वेला : शॉप नं. ०२, पश्चिमेला : पॅसेज, दक्षिणेला : शॉप नं. १बी, उत्तरेला : मेन रोड. **ताबा घेण्याची तारीख : १३ जून २०२३**	**रु. ९४६८५२/-** (रुपये नऊ लाख सेहेचाळीस हजार आठशे बावन्न फक्त) १३ फेब्रुवारी २०२३ रोजीनुसार

प्रतिभूत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या बाबतीत, अधिनियमाच्या कलम १३च्या पोटकलम (८) च्या उपबंधांकडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात येत आहे.

स्थळ : नाशिक
दिनांकित : १७.०६.२०२३

स्वाक्षरी/- (प्राधिकृत अधिकारी)
एसबीएफसी फायनान्स लिमिटेड

दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.

(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)

रजिस्टर्ड ऑफिस : 'कॉसमॉस टॉवर', प्लॉट नं. ६, आयसीएस कॉलनी, युनिव्हर्सिटी रोड, गणेशखिंड, शिवाजीनगर, पुणे-४११ ००७.
फोन : ०२०-६७०८ ५३०८ / ६७०८ ५३११

स्थावर मालमत्ता विक्री नोटीस (सरफेसी ॲक्ट २००२ अंतर्गत नियम ८(६) अन्वये)

अधिकृत अधिकारी दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि. यांनी खाली नमूद केलेल्या, दि सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये बँकेने ताब्यात घेतलेली व खालील प्रमाणे नोंद केलेली स्थावर मिळकत टेंडरद्वारे **'जशी आहे तशी'** विक्री करुन विक्री रकमेतून पुढे नमूद केलेल्या कर्जदाराकडून कर्जाची वसूली करणे करीता इच्छुक खरेदीदारांकडून सीलबंद टेंडर्स मागवित आहोत.

कर्जदार, संचालक, गहाणदार, जामीनदार यांचे नाव आणि शाखा	कलम १३(२) अन्वये पाठविलेल्या मागणी नोटीसीचा तपशील		ताबा दिनांक	विक्री / लिलाव तपशिल	
	दिनांक	रक्कम		दिनांक	वेळ
१) मे. केटीके इन्फोट्रॉनिक्स् प्रा. लि., **ऑफिस पत्ता –** ओशनिया, बी.१०१, लोढा कासा रियो, कल्याण–शीळ रोड, निळजे डोंबिवली, ठाणे – ४२१ २०४ **२) सौ. तृप्ती रुपेश कविश्वर/पातुरकर** **रा.:** फ्लॅट नं. ए-७०३, ७ वा मजला, नयनतारा सिटी २, कर्मयोगी नगर, गोविंद नगर, नाशिक-४२२ ००९. **३) सौ. सुमेधा मनोज ठाकूर** **रा.:** फ्लॅट नं. २३०३, २३ वा मजला, द मॅजेस्टिक टॉवर सीएचएसएल, सयानी रोड, लोअर परेल, प्रभादेवी, मुंबई– ४०० ०२५. आणि ओशनिया, बी.१०१, लोढा कासा रियो, कल्याण–शीळ रोड, निळजे डोंबिवली, ठाणे – ४२१ २०४ **४) श्री. रुपेश अशोक कविश्वर** **रा.:** फ्लॅट नं. ए-७०३, ७ वा मजला, नयनतारा सिटी २, कर्मयोगी नगर, गोविंद नगर, नाशिक-४२२ ००९. आणि ओशनिया, बी.१०१, लोढा कासा रियो, कल्याण–शीळ रोड, निळजे डोंबिवली, ठाणे – ४२१ २०४ **५) श्री. महेन्द्र भास्कर ठाकूर** **रा.:** १७६, कैसारी नगर, नंदूरबार लहान, शहादा नंदूरबार, धुळे– ४२५ ४१२. **शाखा :** नाशिक	२३.०६.२०२०	₹ १,३९,३३,४१२.४३ + पुढील व्याज, खर्च, इ.	१४.०३.२०२३	०६.०७.२०२३	दु. १२:३० वा.

रिझर्व्ह किंमत	बयाणा रक्कम
₹ ११३.२० लाख (₹ एक कोटी तेरा लाख वीस हजार फक्त)	₹ ११.५० लाख (₹ अकरा लाख पन्नास हजार फक्त)

स्थावर मिळकतीचे वर्णन

गाव देवपूर, तालुका आणि जिल्हा धुळे येथील प्लॉट नं. ०९, सीटीएस नं. ४७८२, सर्व्हे नं. ४०/२ब यांसी अंदाजे क्षेत्रफळ ५२९.५४ चौ. मीटर व त्यावरील लोडबेअरींग बांधकाम यांसी क्षेत्रफळ ९२.९१३ चौ. मीटर म्हणजेच ९९२ चौ. फूट ही मिळकत तसेच पुढे बांधण्यात येणारे बांधकाम व त्याचे इतर सर्वसाधारण हक्कांसहीत. सदरची मिळकत ही रविंद्रनाथ टागोर गृहनिर्माण सह. संस्थेचे सदस्य श्री. रुपेश अशोक कविश्वर यांच्या मालकीची आहे. सदर मिळकतीच्या चतु:सीमा पुढीलप्रमाणे – पूर्वेस : प्लॉट नं. ६ आणि ७, पश्चिमेस : रोड, दक्षिणेस : प्लॉट नं.१०, उत्तरेस : प्लॉट नं. ८. बिल्डींग बांधलेल्या संरचनेसह किंवा त्यावर बांधण्यात येणार.

लिलाव / विक्री ठिकाण –दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि., नाशिक शाखा, गुरुदर्शन, प्लॉट नं. १३, शरणपूर त्र्यंबक लिंक रोड, जुन्या पोलिस कमिशनर ऑफिस समोर, नाशिक- ४२२ ००५. (फोन : ०२५३-२५७२९४१)

अटी व शर्ती – १. वरील प्रमाणे नमूद केलेली स्थावर मिळकत ही **'जशी आहे जेथे आहे, जशी आहे जी आहे आणि जी काही आहे तेथे आहे'** या तत्त्वावर विक्री केली जाईल. **२.** टेंडर दाखल करणेपुर्वी अधिकृत अधिकारी यांच्याशी सदर मिळकतीचे मालकी हक्क, टायटल व देयके इ. संदर्भात शहानिशा करुन घेण्याची जबाबदारी खरेदीदार यांची राहील व नंतर याबाबत कुठल्याही प्रकारच्या तक्रारीची नोंद घेतली जाणार नाही. (टेंडर फॉर्म मिळण्याचे ठिकाण दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि., नाशिक शाखा, गुरुदर्शन, प्लॉट नं. १३, शरणपूर त्र्यंबक लिंक रोड, जुन्या पोलिस कमिशनर ऑफिस समोर, नाशिक- ४२२ ००५. (फोन : ०२५३-२५७२९४१). **३.** इच्छुक खरेदीदार यांनी केवायसी कागदपत्रांसह आपले टेंडर/ऑफर्स बयाणा रक्कमेचे पे ऑर्डर/ डीडीसह दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि. या नावाने काढून वरील पत्त्यावर शाखेच्या कामकाजाची वेळ बंद होण्यापूर्वी **दि. ०५.०७.२०२३** रोजी पोहचेल असे पाठविण्यात यावे. **४.** रिझर्व्ह किंमतीपेक्षा कमी किंमतीला आलेले टेंडर्स/ऑफर्स विचारात घेतले जाणार नाही. इच्छुक खरेदीदार यांनी आपले टेंडर/ऑफर्स बयाणा रकमेसह सीलबंद पाकीटात घालुन व पाकीटावर **''मे. केटीके इन्फोट्रॉनिक्स् प्रा. लि. (श्री. रुपेश अशोक कविश्वर) यांच्या मिळकतींचे खरेदीसाठी टेंडर''** असे स्पष्ट नमुद करावे. प्रस्ताव अयशस्वी झाल्यास बयाणा रक्कम परत करण्यात येईल. बयाणा रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही. **५.** विक्री कार्यवाहीतील स्थावर मिळकतींबाबत आवश्यक ते स्टॅम्प ड्यूटी/इतर चार्जेस/ट्रान्सफर आणि रजिस्ट्रेशन चार्जेस, फीज, टीडीएस, जीएसटी, टीसीएस, ई. सर्व अनुषंगिक खर्च नियमानुसार व वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार खरेदीदारास करावा लागेल. **६.** सर्व वैधानिक/गैर वैधानिक देय, कर, दर, मूल्यांकन, शुल्क, दावे इ. जबाबदारी फक्त खरेदीदाराची असेल **७.** सर्व टेंडर्स/ऑफर्स उघडल्या नंतर संभाव्य बोलीदारांना आपापल्या बोली वाढविण्याची संधी देण्यात येईल. बोली हस्तांतर करता येणार नाही. **८.** विक्री कार्यवाहीतील ज्या बोलीदाराची बोली सर्वात जास्त आहे अशा कायम केलेल्या बोलीदाराने २५% रकमेची (त्याच्या बोलीच्या) पुर्तता पुढील १ दिवसाच्या कार्यालयीन वेळेत करणे आवश्यक आहे. सदर रकमेमध्ये त्याने भरलेल्या बयाणा रकमेचा अंतर्भाव करण्यात येईल. सदर रक्कम ''दि कॉसमॉस को-ऑप बँक लि,'' यांच्या नावाने डी.डी./एनईएफटी/आरटीजीएस द्वारे अदा करू शकता. सदर २५% रकमेची पुर्तता बोलीदाराकडून दिलेल्या मुदतीत न झाल्यास त्यांनी भरलेली बयाणा रक्कम कोणतीही पुर्वसुचना अथवा नोटीस न देता जप्त करण्यात येईल. **९.** विक्री रकमेच्या २५% रकमेचा भरणा केल्यानंतर व अधिकृत अधिकारी यांनी विक्री कायम केल्यानंतर उर्वरीत ७५% रक्कम पुढील १५ दिवसांत कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक राहील. जर सदरचा भरणा सदर मुदतीत केला गेला नाही तर भरलेली २५% रक्कम पूर्व सूचना न देता जप्त करण्यात येईल व सदर मिळकतींची विक्री कारवाई पुन्हा करण्यात येईल. **१०.** मिळकतीची पाहणी दिनांक **०३.०७.२०२३ रोजी सकाळी ११:०० ते सायं. ०५:००** या वेळेत करता येईल. **११.** बँकेच्या माहीतीप्रमाणे वरील नमूद मिळकतीवर कोणत्याही प्रकारची देणी नाहीत. **१२.** सदर लिलावाच्या टेंडर्स/ऑफर्स स्विकारणे न स्विकारणे, लिलाव कायम करणे, पुढे ढकलणे, रद्द करणे व इतर सर्व हक्क कोणतेही कारण न देता अधिकृत अधिकारी यांचे राहील. **१३.** विक्री/लिलावाच्या तपशिलवार अटी व शर्ती लिलावाच्या वेळी व लिलावाच्या ठिकाणी वाचण्यात येतील. **१४.** सदर विक्री नोटीस ही बँकेच्या अधिकृत वेबसाईट म्हणजेच **www.cosmosbank.com** वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

टिप:– सदरची १५ दिवसांची नोटीस नियम ८(६) एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये कर्जदार/संचालक/मॉर्गेजर /जामिनदार यांना सुध्दा लागू आहे.

दिनांक : १७.०६.२०२३
ठिकाण : धुळे–नाशिक

राजेश शहा,
सहाय्यक महाव्यवस्थापक व अधिकृत अधिकारी,
दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.

SBFC एसबीएफसी फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालयः युनिट क्र. १०३, पहिला मजला, सीॲण्डबी स्क्वेअर, संगम कॉम्प्लेक्स, चकाला गाव, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९

ताबा सूचना

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ मधील नियम ८(२) नुसार)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे एसबीएफसी फायनान्स लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, २००२ मधील नियम ८ सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद १३(१२) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली नमूद कर्जदार/सह-कर्जदारांना मागणी सूचना पाठविल्या ज्यात त्यांना सदर सूचनेत नमूद केलेल्या रकमेची सदर सूचनेच्या दिनांकापासून ६० दिवसांचे आत परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

कर्जदार/सह-कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने याद्वारे कर्जदार/सह-कर्जदार आणि सर्व लोकांना याद्वारे सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी सदर नियमांमधील नियम ८ सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद १३(४) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खालील वर्णनाच्या मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे.

कर्जदार/सह-कर्जदार आणि सर्व लोकांना याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो एसबीएफसी फायनान्स लिमिटेडच्या भाराधीन असेल.

कर्जदारांचे नाव व पत्ता आणि मागणी सूचनेचा दिनांक	मालमत्तेचे वर्णन आणि ताबा दिनांक	ताबा सूचनेत मागणी केलेली रक्कम (रु.)
१. सतीश कांतिलाल मुथा, २. स्वाती सतीश बेदमुथा, ३. कांतिलाल सुगनचंद मुथा, ४. कांतिलाल सुगनचंद मुथा, सर्वांचा पत्ता, दुसरा मजला, पिनॅकल अपार्ट., गल्ली क्र. ०५, कॉलेज रोड, एनबीटी कॉलेजसमोर, कुलकर्णी बाग, कॉलेज रोड, नाशिक, महाराष्ट्र- ४२२००५. **मागणी सूचनेचा दिनांक: ३० मे २०२२** **कर्ज क्र. 01900009042DH (PR00680562)**	सदनिका क्र. ०२, क्षेत्रफळ सुमारे १६५.४३ चौ.मीटर म्हणजे १७८० चौ.फू. बिल्ट-अप, दुसरा मजला, रुंगठा पिनॅकल अपार्टमेंट या स्कीममध्ये, प्लॉट क्र. ४३ वर बांधलेली, क्षेत्रफळ सुमारे ४७३.८९ चौ.मीटर, सर्व्हे क्र. ७१५/बी/४३, गाव नाशिक **ताबा दिनांक :** १५ जून २०२३	**दि. १३ फेब्रुवारी २०२३ नुसार रु. ९५,७०,४४५/-** (रुपये पंचाण्णव लक्ष सत्तर हजार चारशे पंचेचाळीस फक्त)

सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद १३ मधील उप-विभाग (८) कडे वेधण्यात येते.

स्थान : नाशिक
दिनांक : १७.०६.२०२३

स्वा/- प्राधिकृत अधिकारी
एसबीएफसी फायनान्स लिमिटेड

---

kotak कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

कॉर्पोरेट आयडेन्टिटी नं. एल६५११०एमएच१९८५पीएलसी०३८१३७
झोन-३, न्याती युनिट्री, अहमदनगर रोड, येरवडा, पुणे-४११ ००६, महाराष्ट्र.

विक्री सूचना (ए/डी सह रजि. पोस्ट)

(रुल ६ (२) / ८(६))

प्रति,

०१. **मेसर्स नाना पाटील अॅण्ड कंपनी (मालक : श्री. चंद्रकात अशोक पाटील) (ऋणको व गहाणकार)**
असलेले कार्यालय : शॉप नं. ७०, सुरेशदादा कॉम्प्लेक्स, एमआयडीसी फूड मार्केट, जळगाव-४२५ ००१, महाराष्ट्र.

०२. **श्री. चंद्रकात अशोक पाटील (गहाणकार)** ०३. **श्री. किशोर अशोक पाटील (गहाणकार)** ०४. **श्रीमती निलिमा चंद्रकांत पाटील (हमीदार)**
सर्व २ ते ४ असलेला पत्ता : प्लॉट नं. ५, 'रत्ना', बी. एस. नं. २८५, सीटीएस नं. ८००४, विष्णू नगर, गणेश कॉलनी, जळगाव-४२५ ००१, महाराष्ट्र.

प्रिय महोदय / महोदया,

विषय : सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ च्या रुल्स ६(२) व ८(६)च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत जंगम/ स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

ज्याअर्थी, प्राधिकृत अधिकारींनी सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या सेक्शन १३(४)नुसार (यापुढे 'ॲक्ट' म्हणून संदर्भित) **२९.०५.२०२३** रोजी याखाली नमूद केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला होता, ज्याकरिता तुम्हास **३०.०४.२०२३** रोजीप्रमाणे देय **सीसीओडी अका. नं. ५०१२१६०५७५** च्या अनुसार **रु.८३,३५,२०२.३० (रुपये त्र्याऐंशी लाख पस्तीस हजार दोनशे दोन व पैसे तीस फक्त)** रक्कम असलेल्या तुमच्या/ ऋणकोच्या दायित्वांद्वारा सुरक्षा म्हणून देण्यात आली आहे.

ज्याअर्थी, तुम्ही ॲक्टच्या सेक्शन १३(२) अंतर्गत सूचनेच्या स्वीकृतीनंतरसुद्धा बँकेला तुमच्या/ ऋणकोच्या दायित्वांच्या अनुसार परतफेड करण्यास असमर्थ ठरला आहात. त्यामुळे बँकेने ॲक्ट व रुल्सअंतर्गत मंजूर केलेल्या तिच्या हक्कांच्या निष्पादनांत, या सूचनेच्या तारखेपासून **३० दिवसांच्या** आत **०१.०५.२०२३**च्या प्रभावापासून रकमेवरील पुढील व्याज, किंमत, आकार व खर्च यासह, **३०.०४.२०२३** रोजीप्रमाणे देय **सीसीओडी अका. नं. ५०१२१६०५७५**च्या अनुसार **रु.८३,३५,२०२.३० (रुपये त्र्याऐंशी लाख पस्तीस हजार दोनशे दोन व पैसे तीस फक्त)** या संपूर्ण दायित्वांच्या विमोचनाकरिता तुम्हास फर्माविणारी, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ६(२) (जंगम) व रुल ८(६) स्थावर या अंतर्गत ही सूचना निर्गमित केली आहे, त्यास असमर्थ ठरल्यास, बँक **''जसे आहे जेथे आहे'' व ''जसे आहे जे काही आहे''** आणि **''जे काही आहे तेथे आहे''** या तत्त्वावर सुरक्षित मालमत्तेच्या ई-लिलावाद्वारा विक्रीसह ॲक्टअंतर्गत प्रक्रिया सुरू करील.

विक्रीचा तपशील

लिलावाची तारीख व वेळ	**२० जुलै, २०२३ रोजी स. ११.०० ते दु. ०३.००**		
मालमत्तेच्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेकरिता राखीव किंमत	**₹ १,१६,००,०००/- (रुपये एक कोटी सोळा लाख फक्त)**		
मालमत्तेची इसारा रक्कम ठेव	**₹ ११,६०,०००/- (रुपये अकरा लाख साठ हजार फक्त)**	**वजात करावयाची टीडीएस**	लिलाव विक्रीच्या १%
लिलावाचे स्थळ	**https://kotakbank.auctiontiger.net** या वेबसाइटवर तरतूद केलेल्या ई-लिलावाद्वारा तसेच ऑक्शन टायगर मोबाइल ॲपमार्फत.		

टीडीएस वजा करण्याकरिता शर्ती

- **टीडीएस** वजा करण्यात येणार आहे आणि गहाणकाराच्या नावे जमा करण्यात येईल.
- जर गहाणवट मालमत्ता संयुक्तरीत्या मालकीची आहे, तर **टीडीएस** पहिल्या मालकाच्या नावे कळविण्यात येईल, जोपर्यंत तेथे विक्री विलेखामध्ये मालकीसंबंधित विशिष्ट गुणोत्तर आहे, अशा बाबतीत **टीडीएस** त्यांच्या मालकी गुणोत्तराच्या प्रमाणशीर वजात केला जाईल.
- ऑक्शन खरेदीदार, **टीडीएस** जमा केल्यानंतर, **टीडीएस** प्रदान निश्चितीकरणाचा पुरावा म्हणून फॉर्म नं. १६ए सादर करील.

आयटम नं.	विक्रीकरिता ठेवण्यात आलेल्या मालमत्तेचे वर्णन
(१)	पुढील ज्ञात मालमत्तेचे सर्व खंड व तुकडेः सीटीएस नं. ८००४ (एरिया १६५.५ चौ.मी.) (जुना प्लॉट नं. ५चा भाग, जुना सर्व्हे नं. २८५ पैकी), येथे स्थित- जळगाव, ता. व जि. जळगाव, जळगाव सिटी म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या स्थानिक मर्यादेत आणि उप-नोंदणी जिल्हा कार्यालय जळगाव, ता. जळगाव, जि. जळगावच्या मर्यादेत व **संदर्भित मालमत्ता बिल्डिंग प्लाननुसार सीमित आणि एकूण संदर्भित मालमत्ता पुढीलप्रमाणे सीमित आहे : • पूर्व :** जुना प्लॉट नं. ५ए; **• पश्चिम :** रोड; **• दक्षिण :** जुना प्लॉट नं. ४; **• उत्तर :** जुना प्लॉट नं. ६ त्यावरील विद्यमान बिल्डिंग्ज व स्ट्रक्चर्स आणि संबंधित गहाणवटीच्या तारखेपासून/ नंतर कोणत्याही वेळेत त्यावरील उभारावयाचे/ बांधकाम करावयाचे असल्यानुसार आणि त्यावर सर्व जोडून असलेले आणि सर्व फिक्चर्स व फर्निचर्स तसेच भूमीला जोडून असलेली संयंत्रे व यंत्रसामग्री किंवा सद्य किंवा भावी कालावधीतील, भूमीला कायमरीत्या जोडून असलेली/ स्थिर असलेली कोणतीही वस्तू यासह एकत्रित.

ई-लिलावाद्वारा जंगम/स्थावर मालमत्तेच्या विक्रीच्या शर्ती व अटी

०१. ई-लिलावाचे आयोजन **''जसे आहे जेथे आहे'' व ''जसे आहे जे काही आहे'', '' जे काही आहे तेथे आहे''** आणि कोणतीही तक्रार नाही या तत्त्वावर करण्यात येत आहे. प्राधिकृत अधिकारींना असलेले उत्तम व ज्ञान व माहितीच्या अनुसार तेथे मालमत्तेवर कोणतेही भार नाहीत. तथापि, स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी लिलावावर ठेवण्यात आलेल्या मालमत्तेचा भार, नामाधिकार तसेच मालमत्तेस प्रभावी ठरणारे दावे/ हक्क/ देणी यासंबंधित त्यांनी स्वतः स्वतंत्र चौकशी करावी. प्राधिकृत अधिकारी/ सुरक्षित धनको कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराचे दावे/ हक्क/ देणी यांकरिता कोणत्याही तऱ्हेने जबाबदार असणार नाहीत.

०२. बोली सादर करण्यापूर्वी मत्ता व विनिर्देशाबाबत स्वतःचे समाधान करून घेणे व पाहणी करणे बोलीदाराची जबाबदारी असणार आहे. लिलावाकरिता ठेवण्यात आलेल्या स्वारस्य असलेल्या बोलीदारांना मालमत्तेच्या पाहणीकरिता स्टेट रिकव्हरी मॅनेजर-एबीजी यांच्याशी सल्लामसलत करून बँकेच्या कामाच्या दिवशी अनुमती देण्यात येणार आहे.

०३. स्वारस्य असलेले बोलीदार विक्रीच्या शर्ती व अटींकरिता तसेच लिलाव तपशीलाकरिता **https://kotak.com/en/bank-auction.html** या बँकेच्या कार्यालयीन वेबसाइटला भेट देऊ शकतील. (युजर आयडी व पासवर्ड **https://kotakbank.auctiontiger.net** यावर नावाची नोंदणी करून त्यांच्या ई-मेल आयडी व पासवर्डद्वारा विनामूल्य प्राप्त करता येईल). **राखीव किमतीच्या** १०% **इरठे** मुंबई येथे सममूल्यात देय **'कोटक महिंद्रा बँक लिमिटेड'**च्या नावे डिमाण्ड ड्राफ्ट/ ऑनलाइनद्वारा देय असणार आहे आणि **१८.०७.२०२३** रोजी **दु. ०४.०० वा.** किंवा तत्पूर्वी निविदा प्रपत्रास जोडून परिशिष्ट २ व ३ची स्वाक्षरीकृत व यथोचितरीत्या भरून संबंधित बँक शाखेत सादर करावयाची आहे.

०४. वेब पोर्टलवर बोलीदाराद्वारा नोंदणी केल्यानंतर, स्वारस्य असलेले खरेदीदार/ बोलीदारांनी बोलीच्या सादरीकरणाच्या शेवटच्या तारखेपूर्वी वेब पोर्टलमध्ये अपलोड केलेल्या पुढील कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करणे आवश्यक आहे, म्हणजेच **(१)** डिमाण्ड ड्राफ्टची प्रत **(२)** पॅन कार्डची प्रत **(३)** ओळखपत्र पुरावा (केवायसी) म्हणजेच वोटर आयडी कार्ड/ ड्रायव्हिंग लायसन्स/ पासपोर्ट इ.ची प्रत **(४)** पत्त्याच्या पुराव्याची प्रत **(५)** निविदा प्रपत्रास जोडलेल्या परिशिष्ट २ व ३ची स्वाक्षरीकृत व यथोचितरीत्या भरलेली प्रत, त्याशिवाय बोली नामंजूर होण्यास पात्र ठरतील.

०५. ज्या स्वारस्य असलेल्या बोलीदारास लॉग-इन आयडी व पासवर्ड निर्मिती, अपलोडिंग डेटा, बोली सादरीकरण, ई-बोली प्रक्रियेवरील प्रशिक्षण इ. याबाबत सहाय्य हवे असल्यास, ते **मेसर्स ई-प्रोक्युअरमेन्ट टेक्नॉलॉजीस लि. (ऑक्शन टायगर), अहमदाबादः हेल्पलाइन नं. ०७९-६८१३६८८०/८८१/८३७/८४२/ ०९९७८५९१८८८, support@auctiontiger.net /** ऑक्शन टायगर मोबाइल ॲपवरसुद्धा यांच्याकडून ई-लिलावावरील ऑनलाइन प्रशिक्षणाचा लाभ घेऊ शकतील आणि कोणत्याही मालमत्तेसंबंधित शंकेकरिता संपर्क साधता येईल : बँक अधिकारीचा तपशील : **कोटक महिंद्रा बँक लि., झोन-३, न्याती युनिट्री, अहमदनगर रोड, येरवडा, पुणे-४११ ००६. श्री. दुश्यंतसिंह झाला, फोन नं. ९०९९०९१२६२ किंवा श्री. विश्वानंद कानडे, फोन नं. ७०६६२२९९९५,** कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत.

०६. ज्या खरेदीदारांजवळ युजर आयडी/ पासवर्ड आणि **डिमाण्ड ड्राफ्ट/ ऑनलाइन**द्वारा **इरठे**चे प्रदान निश्चित केले आहे, तेच केवळ ऑनलाइन ई-लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्यास पात्र असणार आहेत.

०७. **मालमत्तेची पाहणी :** स्वारस्य असलेले पक्षकार **१७.०७.२०२३** रोजी **स. ११:०० व दु. ०३:००** दरम्यान मालमत्तेची पाहणी करू शकतील.

०८. ज्या स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी त्यांची इरठे **१८.०७.२०२३** रोजी दु. ०३.०० पूर्वी **डिमाण्ड ड्राफ्ट/ ऑनलाइन**द्वारा राखीव किमतीच्या **१०%**च्या खाली नसलेली त्यांची इरठे सादर केलेली आहे, तेच केवळ ई-लिलावात सहभागी होण्यास पात्र असणार आहेत. वरील मालमत्तेच्या ई-लिलावाचे आयोजन बोलीदारांमध्ये परस्पर बोलीद्वारा वर नमूद केल्यानुसार अचूक निर्धारित तारीख व वेळेत करण्यात येणार आहे.

०९. सादर करावयाची बोली किंमत **प्राधिकृत अधिकारीद्वारा ('प्र.अ.')** निश्चित केलेल्या **राखीव किमती**च्या वरील असावी आणि बोलीदार **आयएनआर २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त)**च्या पटीत त्यांच्या बोलीत पुढे वाढ करतील.

१०. जर बोली ई-लिलाव बंद होण्याच्या वेळी शेवटच्या ५ मिनिटांत ठेवल्या गेल्यास, बंद होण्याची वेळ आपोआप ५ मिनिटांकरिता विस्तारित (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्ताराच्या विषयाधीन) करण्यात येईल. जो बोलीदार, ऑनलाइन लिलाव बंद होण्याच्या वेळी उच्चतर बोली सादर करीत आहे (राखीव किमतीच्या खाली नसलेली) त्याला यशस्वी बोलीदार म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्या प्रभावाकरिता पत्रव्यवहार इलेक्ट्रॉनिक प्रणालीत करण्यात येईल जो प्राधिकृत अधिकारी/ सुरक्षित धनकोच्या मान्यतेच्या विषयाधीन असणार आहे.

११. यशस्वी बोलीदाराची इसारा रक्कम ठेव (**इरठे**) भाग विक्री विचाराधीन म्हणून ठेवून घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदाराची **इरठे कामकाजाच्या १५ दिवसांत** परत करण्यात येईल. इसारा रक्कम ठेवीवर कोणतेही व्याज मिळणार नाही. यशस्वी बोलीदाराने प्राधिकृत अधिकारीद्वारा बोली किमतीच्या स्वीकृतीच्या त्वरित कामकाज बंद होण्याच्या पुढील दिवशी किंवा तत्पूर्वी किंवा विक्री किमतीच्या **२५%** (आधीच प्रदान केलेल्या **इरठे**चे समायोजन करून) ठेव भरावयाची आहे आणि विक्री किमतीच्या उर्वरित **७५% बँकेद्वारा विक्रीच्या निश्चितीकरणाच्या १५ (पंधरा) दिवसां**च्या किंवा सदर विस्तारित कालावधीच्या आत लेखी आणि **प्र. अ.**च्या स्वेच्छाधिकारावर मान्य केल्यानुसार प्रदान करावयाची आहे. जर यशस्वी बोलीदाराद्वारा प्रदानास कसूर झाल्यास, बोलीदाराद्वारा आधीच भरलेली रक्कम जप्त होण्यास पात्र ठरेल आणि मालमत्ता पुनर्लिलावाकरिता ठेवण्यात येईल आणि कसूर करणारा बोलीदाराचा मालमत्ता/ रकमेवर कोणताही दावा/ हक्क असणार नाही.

१२. भावी अर्हताप्राप्त बोलीदार लिलाव तारखेपूर्वी **मेसर्स ई-प्रोक्युअरमेन्ट टेक्नॉलॉजीस लि.**कडून ई-लिलावावर ऑनलाइन प्रशिक्षणाचा लाभ घेऊ शकतील. **प्राधिकृत अधिकारी**/ बँक किंवा **मेसर्स ई-प्रोक्युअरमेन्ट टेक्नॉलॉजीस लि.** कोणत्याही नेटवर्क समस्येकरिता जबाबदार असणार नाहीत आणि स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी ई-लिलाव कार्यक्रमात सहभागी होण्याकरिता तांत्रिकदृष्ट्या उत्तमरीत्या सुसज्ज असल्याची खात्री करून घ्यावी.

१३. खरेदीदार लागू स्टॅम्प ड्यूटीज/ अतिरिक्त स्टॅम्प ड्यूटी/ हस्तांतरण आकार, शुल्क इ. तसेच कोणत्याही व्यक्तीकडील सर्व सांविधिक/ बिगर-सांविधिक देणी, कर, दर, निर्धारित कर, आकार, शुल्क इ. सोसेल.

१४. **प्राधिकृत अधिकारी** उच्चतर प्रस्ताव स्वीकारण्यास बांधील नाहीत आणि **प्राधिकृत अधिकारीस** त्याकरिता कोणतेही कारण न देता कोणताही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचा किंवा नामंजूर करण्याचा किंवा ई-लिलाव स्थगित करण्याचा/ पुढे ढकलण्याचा/ रद्द करण्याचा एकमेव हक्क आहे.

१५. बोलीदारांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी ई-लिलावात भाग घेण्यापूर्वी आणि त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी **https://kotakbank.auctiontiger.net** या **मेसर्स ई-प्रोक्युअरमेन्ट टेक्नॉलॉजीस लि.**च्या वेबसाइटवर उपलब्ध ई-लिलावाच्या सविस्तर शर्ती व अटी काळजीपूर्वक वाचाव्यात.

१६. प्रसिद्धी सक्तीच्या घटना कलमाच्या विषयाधीन आहे.

१७. विक्री प्रमाणपत्र सुरक्षा धनकोद्वारा विक्रीची निश्चिती आणि लिलाव खरेदीदाराकडील फॉर्म नं. १६ए अंतर्गत टीडीएस प्रमाणपत्राचे सादरीकरण व संपूर्ण विक्री विचाराधीन झाल्यानंतर निर्गमित करण्यात येणार आहे. विक्री प्रमाणपत्र यशस्वी बोलीदाराच्या नावे निर्गमित करण्यात येईल. बोली सादर केलेल्या/ ई-लिलावात सहभागी झालेल्या व्यक्तीखेरीज कोणत्याही अन्य व्यक्तीच्या नावे विक्री प्रमाणपत्रात बदल करण्याकरिता विनंती स्वीकारली जाणार नाही.

१८. बोलीदाराद्वारा एकदा बोली सादर केल्यास, त्या मागे घेता येणार नाहीत/ रद्द करता येणार नाहीत आणि बोलीदार अंतिम बोली किमतीत मालमत्तेची खरेदी करण्यास बांधील राहील. त्यात नमूद केलेल्या, ई-लिलावाच्या कोणत्याही शर्ती व अटींचे बोलीदाराकडून अनुपालन न झाल्यास, कसूरदार बोलीदाराद्वारा प्रदान केलेली रक्कम जप्त करण्यात येईल.

१९. यशस्वी बोलीदाराच्या घोषणेसंबंधित प्राधिकृत अधिकारींचा निर्णय सर्व बोलीदारांकरिता अंतिम व बांधील असणार आहे. **प्राधिकृत अधिकारीस** कोणतेही कारण न देता, यशस्वी बोलीदार घोषित करण्यापूर्वी, कोणत्याही वेळेत ई-लिलाव प्रक्रिया/ निविदा रद्द करण्याकरिता स्वातंत्र्य आहे. शर्ती असलेल्या बोली अवैध समजल्या जातील. कृपया नोंद घ्यावी की, बोलीच्या सादरीकरणानंतर, बोलीमधील कोणत्याही बदलाबाबत पत्रव्यवहार केला जाणार नाही. कोणत्याही व्यक्तीकडील सर्व सांविधिक/ बिगर-सांविधिक देणी, कर, दर, निर्धारित कर, आकार, शुल्क इ.चे प्रदान करणे केवळ यशस्वी बोलीदाराची एकमेव जबाबदारी असेल. बोलीची वैधता, बोली रक्कम, बोलीदाराच्या पात्रतेकरिता एकदाची इरठे, बोलीदाराची प्रतिनिधित्व करणारी अधिकृत व्यक्ती, अर्थबोध याबाबत कोणताही वाद उद्‌भवल्यास आणि **प्राधिकृत अधिकारी**चा निर्णय अंतिम राहील. अशा परिस्थितीत, बँक विक्री स्थगित करण्यास तिचा एकमेव हक्क राखून ठेवीत आहे आणि मालमत्ता पुन्हा एकदा बँकेद्वारा निश्चित करावयाच्या कोणत्याही तारीख व वेळेत विक्रीकरिता ठेवण्यात येईल. कोणत्याही प्रकारच्या वादाकरिता, बोलीदारांनी केवळ संबंधित बँकेच्या **प्राधिकृत अधिकारीशी** संपर्क साधणे आवश्यक आहे.

२०. विशेष सूचना, शेवटच्या क्षणी बोली देणे बोलीदारांच्या स्वहितार्थ टाळणे. **कोटक महिंद्रा बँक लिमिटेड** किंवा सेवा-पुरवठाकार कोणतीही चूक/ फेल्यूअर (इंटरनेट फेल्यूअर/ पॉवर फेल्यूअर इ.) याकरिता जबाबदार असणार नाहीत. अशा आकस्मिक परिस्थितीस सामोरे जाण्याकरिता बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सर्व आवश्यक व्यवस्था/ पॉवर सप्लाय बॅक-अप इ.सारख्या पर्यायी व्यवस्था करावी जेणेकरून ते अशा बिकट परिस्थितीस सामोरे जाण्यास सक्षम आहेत आणि यशस्वीरीत्या लिलावात सहभागी होण्यास सक्षम आहेत.

तारीख : १४.०६.२०२३
स्थळ : जळगाव, महाराष्ट्र

स्वाक्षरी/-
प्राधिकृत अधिकारी
कोटक महिंद्रा बँक लिमिटेडकरिता